# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३.
Tel. No. Jt. Commr. 22620238 * Dy. Commr. 22665569

वाचले - १) शासन पत्र, गृह विभाग, क्र. इएसटी-१७१८ / प्र. क्र. १५५ / भाग-२/ राउशु-१, दि. ०३-११-२०२१ च्या सोबत प्राप्त झालेले महाराष्ट्र लोकसेवा आयोग, यांचे पत्र क्र. १४४२/ गट-क संयुक्त -दु. नि. / २०१९ / चोवीस, दि. १३.१०.२०२१ अंतर्गत ३३ उमेदवारांची सुधारित शिफारस यादी. त्यासोबतचे महाराष्ट्र लोकसेवा आयोग, यांचे पत्र क्र. १४४२ / गट-क संयुक्त – दु. नि. / २०१९ / तेरा - ब, दि. २८-०७-२०२०.

२) विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे, यांचे पत्र क्र. इएसटी ११२०१८ / ३६० / आस्था (भाग-२)/विउआ-२/७६०, दि.२९-११-२०२१ नुसार, शिफारसपात्र उमेदवारांची शारिरीक व कागदपत्रे पडताळणी केल्याबाबतचा प्राप्त झालेला अहवाल.

## आदेश

क्रमांक - इएसटी ११२०/MSEC/२०२०/१२६३६/११/२-अ-२ मुंबई, दिनांक २० जानेवारी, २०२२.

उपरोक्त वाचले क्र.१ नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क (मुख्य) परीक्षा - २०१९ च्या सुधारित निकालाच्या अनुषंगाने, मागणीनुसार राज्य उत्पादन शुल्क, दुय्यम निरीक्षक (गट " क ") या पदावर नियुक्तीसाठी, सुधारित ३३ उमेदवारांची शिफारस यादी जाहिर केली आहे. उपरोक्त वाचले क्र.१ नुसार शिफारसपात्र उमेवारांच्या नियुक्तीबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. शिफारसप्राप्त उमेदवारांची दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सेवाप्रवेश नियम-२००९ मधील तरतुदीनुसार वाचले क्र.२ नुसार शारिरीक पडताळणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर त्यांची कागदपत्र पडताळणी करण्यात आलेली आहे. याबाबी विचारात घेऊन शिफारसप्राप्त खालीलप्रमाणे निर्देशित केलेल्या संबधित उमेदवारांना राज्य उत्पादन शुल्क, दुय्यम निरीक्षक, गट-क या पदावर परिविक्षाधीन दुय्यम निरीक्षक म्हणून निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच त्यांची पदस्थापना स्तंभ क्र. ५ येथे नमुद केलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शिफारस यादी क्र. | उमेदवाराचे नांव | शिफारस प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १ | श्री. सरवटे विशाल कुमार, जि. कोल्हापूर | OPEN GENERAL-१ | भरारी पथक, जि.सिंधुदुर्ग |
| २ | ३ | श्री. पाटील अरविंद लक्ष्मण, जि.मुंबई शहर | OPEN GENERAL-२ | मे.टॉपडोम, FL-१, जि. मुंबई उपनगर |
| ३ | ४ | श्री. स्वप्नील सतीशराव कदम, जि.नांदेड | OPEN GENERAL-३ | मे.वाईन एंटरप्रायजेस, जि.पुणे |
| ४ | ५ | श्री. गजानन गोविंदराव पवार, जि.नांदेड | OPEN GENERAL-४ | भरारी पथक, जि.बीड |
| ५ | ६ | श्री. सौरभ सुभाष आवटे, जि. अहमदनगर | OPEN GENERAL-५ | भरारी पथक, जि.धुळे |
| ६ | ७ | श्री. सुरेन्द्र मनोहर बुटले, जि. चंद्रपूर | OPEN GENERAL-६ | भरारी पथक, जि.वर्धा |

| अ. क्र. | शिफारस यादी क्र. | उमेदवाराचे नांव | शिफारस प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ७ | १४ | श्री. संघर्ष रामचंद्र मेश्राम, जि. चंद्रपूर | SC-GENERAL-१ | सीमा तपासणी नाका, माणेगांव टेक, जि.नागपूर |
| ८ | २१ | श्री. सुमेध दासु चव्हाण, जि.बीड | SC-GENERAL-२ | सीमा तपासणी नाका, उमरगांव, जि.लातूर |
| ९ | २४ | श्री. योगेश जगन यलसटवाड, जि.नांदेड | ST-GENERAL-१ | भरारी पथक, जि.नागपूर |
| १० | २५ | श्रीमती सुकेशनी विजय शिंदे, जि.सोलापूर | SC-Female-१ | भरारी पथक, जि.अहमदनगर |
| ११ | २६ | श्री. सचिन संभाजी शिंदे, जि.सांगली | OPEN- Exser-१ | भरारी पथक, जि.धुळे |
| १२ | २७ | श्रीमती श्रुतीका सुनिल भोसले, जि.पुणे | SC-Female-२ | मे.प्रिव्हीलेज इंडास्ट्रीज, लोणंद, जि.सातारा |
| १३ | २८ | श्री. सागर अशोक चव्हाण, जि. नाशिक | ST-GENERAL-२ | सीमा तपासणी नाका, पळसनेर, जि.धुळे |
| १४ | ३० | श्री. रास्कर प्रदिप साहेबराव, जि.सांगली | OPEN-Exser-२ | सीमा तपासणी नाका, इन्सुली, जि.सिंधुदूर्ग |
| १५ | ३१ | श्री. दत्तु बानाजी कोळपे, जि.अहमदनगर | OPEN-Exser-३ | सीमा तपासणी नाका, जि.नंदूरबार |
| १६ | ३३ | श्री. सोमनाथ रामदास शेलार, जि.अहमदनगर | SC-Exser-१ | भरारी पथक, जि.जळगांव |

उपरोक्त उमेदवारांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये "दुय्यम निरीक्षक (गट-क)" या पदावर ते रुजु होतील त्या दिनांकापासून (S - १२ : Rs. ३२००० - १०१६००) अधिक इतर भत्ते या वेतनश्रेणीमध्ये, संबधिताचे वैद्यकीय अहवाल व पुर्वचारित्र्य पडताळणी अहवाल अनुकूल प्राप्त झालेले असल्याने खालील शर्तीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

१. उपरोक्त उमेदवार यांची सदरची शासकीय नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती पुर्वसूचनेशिवाय कोणत्याही वेळी समाप्त केली जाऊ शकेल.

२. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सेवाप्रवेश नियम-२००९ नुसार, दुय्यम निरीक्षक या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, दोन वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन असेल, परिवीक्षा कालावधी जास्तीत जात एक वर्षापर्यंत वाढविण्यात येईल. त्याला / तिला परिवीक्षाधीन कालावधी आणि विहित प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले नाही किंवा त्याने / तिने ती विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही अथवा तो / ती त्या पदाकरीता योग्य असल्याचे आढळुन न आल्यास तो / ती सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल.

३. दुय्यम निरीक्षक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस, आयुक्त वेळोवेळी विनिर्दिष्ट करतील अशा कालावधीचे, स्वरुपात आणि त्याठिकाणी शारीरिक प्रशिक्षण (यामध्ये पोलीस प्रशिक्षणचा समावेश आहे) व आसवनी प्रशिक्षण घ्यावे लागेल. या प्रशिक्षणामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने अंमलबजावणी करावयाच्या कायद्यांचा अभ्यास आणि त्या कायद्यांमध्ये विहित केलेली राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांची कार्ये आणि कर्तव्याबाबतच्या तरतूदी यांचा समावेश असेल.

४. शिफारस करण्यात आलेल्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांचे जाती/जमातीचे दावे संचालक, समाज कल्याण संचालनालय,पुणे/संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडून तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. संबंधितांची प्रमाणपत्र "**अवैध**" ठरल्यास त्यांची नियुक्ती रद्द

करण्यात येईल.

५. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी - २०११ / प्र. क्र. १०६४ / २०११ / १६-ब, दि. १२-१२-२०११ मधील तरतुदीनुसार संबधित उमेदवारांची जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिकाऱ्यांस तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी सदर कागदपत्रे संबधित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्यांच्या आत उमेदवाराने जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समितीकडून घेणे आवश्यक राहील. विहित मुदतीत जात पडताळणी समितीकडुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्राप्त न झाल्यास आपल्या नियुक्तीबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तथापि ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आलेली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी-१० / २००४ / प्र. क्र. ५७० / मावक-५, दि. १६-०५-२००७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

६. महिलांच्या आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांकडुन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. ८२ / २००१ / मसेआ-२००० / प्र. क्र. ४१५ / का.२, दि.२५-०५-२००१ नुसार शासनाने प्रस्तावित केलेले उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेयर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र शासन निर्णय क्र.सीबीसी-२०२०/प्र.क्र.१८/मावक, दि.३१ जानेवारी, २०२० मधील तरतुदीनुसार संबंधित महसुली विभागीय आयुक्त यांचेकडुन तपासून घेण्यात येईल व त्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. संबंधित प्रमाणपत्रे अवैध ठरल्यास तात्काळ प्रभावाने त्यांची सेवा समाप्त येईल.

७. माजी सैनिक पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची सर्व प्रमाणपत्रे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांना नियुक्ती देण्यात येत आहे.

८. उपरोक्त उमेदवार यांना सा.प्र.शा. निर्णय क्र. विपधो/२६२०/प्र.क्र.१६/का.१७ दि. ३१.३.२०२१ नुसार विभागीय परिक्षे संदर्भात तरतूदी लागू आहेत.

९. उपरोक्त उमेदवार यांनी शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मभाप १०८७ /१४ / सीआर-२ / ८७ / २०, दिनांक ३०-१२-१९८७ व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप १०८० / १३१ / वीस, दिनांक २५-०५-१९८१ तसेच क्र. हिंभाप १०८३ / १४४८ / तीस, दिनांक ०१-१२-१९८८ मधील तरतुदीनुसार एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तसेच यानंतरही शासन वेळोवेळी विहित करील अशा परीक्षा त्यांनी उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील.

१०. उपरोक्त उमेदवार यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अंनियो - २०१२ / प्र. क्र. ९६ / सेवा-४, दिनांक २७-०८-२०१४ नुसार "**राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)**" लागू राहील.

११. उपरोक्त उमेदवार यांनी शासन निर्णय क्र. मातंस २०१२ / प्र. क्र. २७७ / ३९, दि. ०४-०२-२०१३ मधील नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता वा सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण २००० / प्र. क्र. ६१ / २००१ / ३९, दि. १९-०३-२००३ व शासन अधिसुचना क्र.एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/कार्या.१२, दि.२८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार आवश्यक संगणक पात्रतेची अर्हता वा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र तसेच माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेले संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची यथास्थिती शासकीय सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच याबाबत शासनाच्या वेळोवेळीच्या दुरुस्ती / आदेशानुसार याबाबत पुर्तता करणे क्रमप्राप्त राहील.

१२. उपरोक्त उमेदवार यांनी शासकिय कर्मचाऱ्यांकरिता विहित केलेल्या वर्तणूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१३. उपरोक्त उमेदवार यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास सेवा कालावधीत घोषित केलेल्या स्वग्रामामध्ये त्यांना बदल करता येणार नाही.

१४. नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव उपरोक्त उमेदवार यांना शासकिय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर किंवा राज्य / केंद्र शासनाच्या अन्य पदावरील नियुक्ती स्विकारावयाची असल्यास त्यांनी नियमानुसार शासनास त्यासंबंधीची लेखी सूचना एक महिना आगाऊ देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना एक महिन्याचे मूळ वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

१५. संबंधित उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. विहित कालावधीमध्ये रुजू न झाल्यास त्यांची दुय्यम निरीक्षक पदावरील नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

१६. पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

१७. दुय्यम निरीक्षक पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीस पात्र असेल.

१८. उपरोक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिर केलेल्या निकालानुसार गुणानुक्रमानुसार राहील. तसेच काही उमेदवारांनी मा. न्यायालयीन प्रकरणामध्ये दाखल केलेल्या विविध याचिकेच्या संदर्भात होणाऱ्या न्यायनिर्णयानुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल. तसेच या भरती प्रक्रियेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई इत्यादी ठिकाणी दाखल विविध याचिका / मुळ अर्जांच्या अनुषंगाने मा.न्यायाधिकरणाकडून पारित होणारे आदेश सर्व संबधित उमेदवारांना बंधनकारक राहतील.

१९. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही - २०१८ / व्ही.आय.पी. ६७ / प्र. क्र. २०७ / कार्या. १२, दि. २८ मे, २०१८ नुसार, ज्या उमेदवारांची प्रतिक्षायादीमधून शिफारस झाली आहे असे उमेदवार, या आदेशानुसार ते ज्या दिनांकास रुजू होतील त्या दिनांकास त्यांची ज्येष्ठता निर्धारीत केली जाईल. त्यांना मुळ गुणवत्ता यादीनुसार ज्येष्ठतेचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

संबंधीत विभागीय उप आयुक्त / अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत उमेदवारास नियुक्ती आदेश तात्काळ बजावण्याची कार्यवाही करुन त्याची दिनांकित पोहोच अभिलेखावर जतन करावी .तसेच सदर उमेदवार हजर होण्यासाठी आल्यास त्यांना तात्काळ हजर करुन घ्यावे व तसा अहवाल (वा उमेदवार विहीत मुदतीत हजर न झाल्यास तसा अहवाल) या कार्यालयास संबंधित अधीक्षकांनी सादर करावा. त्याचप्रमाणे उपरोक्त उमेदवारांना या विभागात पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झालेल्या दिनांकापासून वेतन अदा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

संबधित उमेदवार

(मार्फत:- संबधित विभागीय उप आयुक्त / अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क - निवासी पत्ता असलेला जिल्हा तसेच पदस्थापनेचे कार्यालय)

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | निवासी पत्ता |
|---|---|---|
| १ | श्री. सरवटे विशाल कुमार | मु.आसुर्ले, पो. पोरले, जि.कोल्हापुर- ४१६२२९ |
| २ | श्री. पाटील अरविंद लक्ष्मण | घर नं.१, बिल्डींग नं.११, महात्मा जोतीबा फुले मार्ग, कोहिनुर मिल कंपाऊंड जवळ, नायगाव, दादर, मुंबई शहर- ४०००१४ |
| ३ | श्री. स्वप्नील सतीशराव कदम | कृष्णामाई बिल्डींग, संभाजी मार्ग, वसंत नगर, नांदेड-४३१६०२ |
| ४ | श्री. गजानन गोविंदराव पवार | मु.पो.खाटगांव, पाटील निवास, देगलुर बोधन रोड, ता.बिलोली,नांदेड-४३१७३६ |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | निवासी पत्ता |
|---|---|---|
| ५ | श्री. सौरभ सुभाष आवटे | घर न.२,टेक वस्ती,कारजुले हाऱ्या, गावठाण, ता.पारनेर, अहमदनगर-४१४३०४ |
| ६ | श्री. सुरेन्द्र मनोहर बुटले | मुं.पो. तोहगांव, ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपुर-४४२७०१ |
| ७ | श्री. संघर्ष रामचंद्र मेश्राम | पंचशील नगर,वार्ड नं.६,ताडोबा रोड,मेजर गेट जवळ, उर्जानगर नेरी, ता.जि.चंद्रपुर-४४२४०४ |
| ८ | श्री. सुमेध दासु चव्हाण | मु.पो. शंकरनगर, न्यु मोरेवाडी रस्ता, ता.अंबाजोगाई, जि.बीड-४३१५१७ |
| ९ | श्री. योगेश जगन यलसटवाड | घर नं.४०८, रुक्मीणी निवास, आनंद वस्ती,कॅनाल रोड, ता.अर्धापुर, जि.नांदेड-४३१७४५ |
| १० | श्रीमती सुकेशनी विजय शिंदे | तुकाराम अपार्टमेंट, प्लॅट नं.बी-१४, रेल्वे स्टेशन रोड, नियर मयुर बंगला, सोलापुर (उत्तर) सोलापुर-४१३००१ |
| ११ | श्री. सचिन संभाजी शिंदे | मु.पो. नागज, कुंभार गल्ली, ता.कवठेमहाकाल, जि.सांगली- ४१६४०३ |
| १२ | श्रीमती श्रुतीका सुनिल भोसले | सावली प्लॉट नं.४९, २८, झोन नं.६-२ भिगवन रोड, माऊली नगर जालोची, ता.बारामती, जि. पुणे-४१०२०६ |
| १३ | श्री. सागर अशोक चव्हाण | रो हाऊस नं.२०,भार्गावराम गृ.नि.सोसायटी, त्रीकोणी बंगला रोड, अयोध्या नगरी, पंचवटी, ता.जि. नाशिक-४२२००३ |
| १४ | श्री. रास्कर प्रदिप साहेबराव | सोहोली रोड, मालवाडी, ता.कडेगांव, जि. सांगली-४१५३०४ |
| १५ | श्री. दत्तु बानाजी कोळपे | कोळपेवाडी, अहमदनगर-४२३६०२ |
| १६ | श्री. सोमनाथ रामदास शेलार | सातपुर रोड, पदमश्री नगर, लोणी बी.के., ता. राहता, अहमदनगर-४१३७३६ |

प्रत- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. मा.महालेखापाल महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
२. अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र शासन, बांद्रा (पू.), मुंबई.
३. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
४. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
५. संबधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
६. संबधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. या कार्यालयातील का. क्र. २-अ-२, २-क, प्रदक-१०, १२ (२ प्रती).